| Publication: Pune Metro | Pg No: 3 |
|---|---|
| Edition – Print | Date – 24.09.2021 |

**Four high-impact social entrepreneurs nominated as finalists of the 'Social Entrepreneur of The Year' Award - India 2021 By Schwab Foundation & Jubilant Bhartia Foundation**

# श्वाब फाउंडेशन आणि ज्युबिलंट भारत फाउंडेशनतर्फे देण्यात येणा-या 'सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर'- अवॉर्ड इंडिया २०२१ च्या अंतिम फेरीसाठी चार प्रभावशाली सामाजिक उद्योजकांची नामांकने

नोएडा, : वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची संस्था श्र्वाब फाउंडेशन फॉर सोशल आंत्रप्रेनरशिप आणि ज्युबिलंट भारती ग्रुपची ना-नफा तत्वावर चालणारी संस्था ज्युबिलंट भारतीय फाउंडेशन यांनी आज सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर (एसईओवाय) अवॉर्ड - इंडिया २०२१ साठीच्या अंतिम फेरीतील नामांकनांची यादी जाहीर केली.

अपर्णा हेगडे, अरमान,सीमा प्रेम, फिया ग्लोबल,प्रांशु सिंघल, करो संभव, शुचिन बजाज, उजाला सिग्नस या यशस्वी प्रभावशाली सामाजिक उद्योजकांची एसईओवाय अवॉर्ड - इंडिया २०२१ च्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे:

विविध कार्यक्षेत्रांची पार्श्र्वभूमी लाभलेल्या दिग्गज आणि सन्माननीय व्यक्तिमत्त्वांचा समावेश असलेल्या परीक्षक मंडळाकडून पुरस्काराच्या अंतिम विजेत्याची निवड केली जाईल.

'सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर' अवॉर्ड - भारत २०२१ या पुरस्काराचा मानकरी ठरणा-या सामाजिक उद्योजकाचे नाव गुरुवार, ७ ऑक्टोबर २०२१ रोजी होणा-या व्हर्च्युअल सोहळ्यामध्ये जाहीर केले जाईल. समाजकार्याच्या अपार उर्मीने काम करणा-या या व्यक्तींच्या अनुकरणीय योगदानाचे कौतुक करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या व्हर्च्युअल पुरस्कार सोहळ्यामध्ये जगभरातील अनेक प्रतिष्ठीत व्यक्तींची उपस्थिती असणार आहे.अनेक आघाड्यांवर सामोरी येणारी आव्हाने पार करत सामाजिक यंत्रणेत बदल घडवून आणणा-या कार्यपद्धतींच्या बळावर सर्वसमावेशक विकास साध्य करण्याच्या प्रवासात कळीची भूमिका निभावत असलेल्या आश्र्वासक आणि यशस्वी सामाजिक उद्योजकांच्या कामाची दखल घेणे हे एसईओवाय पुरस्कारांचे लक्ष्य आहे.